MHKO050045812019

**नियमित दिवाणी दावा क्र. ३४२/२०१९ मधील**
**नि. २४ खाली आदेश**
**श्रीमती सकिना लालखान लाड वि. रफिक निजाम सनदी वगैरे**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ७ यांनी विना कैफियतचा आदेश रद्द होउन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. ७ चे कथन असे की, प्रस्तूतचा दावा वाटप, कब्जा हक्कज्ञापन व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. याकामी समन्स बजावणी नंतर प्रतिवादी क्र. ७ दि. ०७/११/२०१९ रोजी अॅड. पी.एन.शर्मामार्फत हजर झाले होते. मूदतीत कैफियत न दिल्याने त्यांच्या विरुध्द विना कैफियतचा आदेश पारित झाला आहे. प्रतिवादीचे वकिल अन्य कामात व्यस्त असल्याने त्यांनी कैफियत व म्हणणे देण्यास दुर्लक्ष केले आहे. ही बाब लक्षात आल्यानंतर प्रतिवादी क्र. ७ यांनी नविन वकिल नेमून हा अर्ज दाखल केला आहे. या प्रतिवादीने प्रतिवादी क्र. १ व ३ ते ६ यांच्याकडून गट क्र. ९५५ पैकी २६ आर क्षेत्र दि. ०५/०४/२०१९ रोजीच्या नोंद खरेदीपत्राने खरेदी केले आहे. खरेदीनंतर त्यांनी मिळकत गहाण ठेवून कर्जे काढलेली आहेत. वादीने ही परिस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. या प्रतिवादीचे दावा मिळकतीत हक्कसंबंध गुंतलेले आहेत. त्यांनी जाणूनबुजून कैफियत देण्यास टाळाटाळ केलेली नाही. त्याला कायदयाचे ज्ञान नाही. दावा गुणदोषावर चालल्यास वादीचे काहीही नूकसान होणार नाही. या कारणावरुन त्यांनी अर्ज मंजुर करणेची विनंती केली आहे.

३. वादीने अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला

आहे. त्याचे म्हणणे असे की, पुरेशी संधी देवूनही प्रतिवादी यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी पर्यायी विनंती केली की, अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रतिवादी क्र. ७ वर रक्कम रुपये ५,०००/- खर्च बसविण्यात यावा.

४. उभय पक्षकारांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

५. प्रतिवादी क्र. ७ ला दि. ०६/११/२०१९ रोजी समन्स बजावणी झाली आहे. तो दि. ०७/१२/२०१९ रोजी वकिलांमार्फत हजर झाला आहे. नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी क्र. ७ यांना दाव्यास कैफियत दाखल करणेस परवानगी देणे उचित ठरणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु सदरचा अर्ज मंजूर करताना वादीना नुकसान भरपाई म्हणून योग्य ती कॉस्ट प्रतिवादी क्र. ७ ने देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे -

## आदेश

१. प्रतिवादी क्र. ७ यांनी पुढील तारखेपर्यंत किंवा तत्पूर्वी वादीला रक्कम रुपये १,०००/- खर्च देणेच्या अटीवर निशाणी २४ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by Ganesh Arun Karajgar
Date: 2022.04.21 17:19:33 +0530

**ठिकाण - इचलकरंजी**
**दिनांक - २१/०४/२०२२**

**(जी. ए. करजगार )**
**६वे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी.**